लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# I celebrate because of U...

**✶ Shaunak Jaykar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Celebrations. Okay. When I first heard that I have to write over this topic, the very first idea that struck my mind was why not write over something that I cherish the most. Something that brings a smile over whenever I think about it. And yes, I do know one such thing.

We all celebrate many things. Occasions, specially festivals are the most celebrated apart from our festivals, we do celebrate many small small things also like celebration of winning something, celebtration of achieving something, celebration of finally finishing off those head-eating hoy screwing semester exams, celebrations of your near, dear one's birthdays and lot lot more surely they do bring happiness as they are attached to your heart. and one such thing that's attached to my heart and which always brings a smile on my face are my friends.

Friends are one such relation where in you get to choose whom you want to be friends with. It is like a lucky draw where in you pick your luck. And I find myself to be so lucky enough becouse I've won the lottery. Seriously! these peps I've in my life are no less than winning the jackpot. Each and every moment with them is a long cerishing memory and the time spent with them is surely so fruitful that it reaps away throughout all time when I am not with them. Whenever I feel down or depressed; a thought about them brings a smile and a talk refreshes the mood. Here is a little description about my cotusa gang.

The very first person I would like to introduce you all is the most important person in my life. He is one such person with I can extremely mad and soo free that sometimes I wish why God didn't make him my sibling. To be tagged, he is my fast friend, but in our college terminology, bhai hai woh mera. He is known to every single incident happening in my life and like a mentro he solves every problem. I appreciate the fact that he's got solution to each and every problem I face. There are absolutely no similarities between us. Our cultures are different, living patterns are different even our thinking is different, yet we know each other so well that predicting his next move is no big task.

The next person is the one who always listens to all what I talk. I always thank her after I'm done talking because I talk a lot and by a lot. I really mean A lot! Whenever I want to free my mind, I call her up and she listens to all of is without interupting. We never have short talks and we never need a topic either to talk about. Even the most stupidest or dumbest topic we have a talk over. Like the way she listens to me, I never listen to hers, sorry. Its actually because there is so much to say rather than to hear. Haha.

Another person like this whom I cherish is the one who understands me very well. Infact so well that whenever I have to prove someone that I am right (when actually I am), I explain her first so that I have a person on my side got the most prettiest smile. And when she laughs, her nose flaps along and in front of this, you won't be

able to hold your anger long. Its really fun to be along with her because she's way cheerful.


Next is the one whom I would definately want to be with me lifelong. We are so good friends that we quarrel alot and never feel bad about it. Our thinking is like the poles. Totally opposite! I still remember our first meet she quarreled that time also but yet we became friends and I still keep wondering how.

My late night mate is next in line. She studies like me at night and so during breaks, if I get bored, I just text her up and if shes also free we talk. So it is like all day and night I've amazing people to talk to. She is one matured friend of mine but she's still a kid by heart. My dwarf friend she is. And also my selfie partner. I don't even know how many selfies we have together.

My shayari friend is no less than an owl. He would sleep all day and be awake all night. Any time I text him at night, it doesn't take him seconds to reply. He writes amazing shayaris and they are awesome to read. See, such talented people I am surrounded by.

Its been more than a year or two since I know them but it feels like I know them since ages. And this is what I celebrate. Our bonding, our understanding. These gems are certainly worth treasuring. I hope everyone have such people around them so that even their life becomes as amazing and colourful as mine. I love them all.

## हास्यचित्र



कथा

# सुखाचा शोध

## ✶ सौ. विजयश्री नवलकर ✶

पावसाची रिमझीम चालूच होती. पहिल्या पावसाचा मातीचा सुगंध दरवळत होता. मला जवळच असलेल्या 'जॉगर्स पार्क'मध्ये जाऊन फेरी मारायची सवय होती. एका बाकावर एक मुलगी त्या पार्कमध्ये पुस्तक घेऊन अभ्यास करत होती. परंतु तिच्या तोंडावर फारच दु:खी भाव दिसत होते. कोण असेल ही मुलगी? कोणासाठी ही सुंदर मुलगी अश्रू ढाळते?... आणि पुष्कळ पण वाचते? असे विचार मनात येतात तोपर्यंत मी त्या मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र आणि हिरव्या बांगड्या पाह्यल्या.

मला राहवत नव्हते, 'काय असेल हिचं दु:ख बरे?' मी तिच्याच बाजूला बसले आणि विचारले 'मुली तुझ्या डोळ्यात अश्रू कसे'? ती म्हणाली, 'माझा एक डोळा दु:खाश्रु देतो तर दुसरा डोळा आनंदाश्रू देतो.''

मला त्याचा अर्थ समजला नाही. दुसऱ्या दिवशीसुद्धा मला ती तेथेच बसलेली दिसली. तेव्हा मी तिला माझ्याबरोबर घरी येण्याची विनंती केली. ती प्रथमच घरी आली आणि मी प्रेमाने तिची चौकशी केली. माझ्या प्रश्नाने तिला गहिवरून आले. पावसाच्या पाण्यावर जसे तेलाची गाडी जाऊन वळ पडावे, आणि तरंगत रहावे तशी तिची अवस्था झाली ''मावशी, माझ्या जीवनात फारच थोड्या व्यक्ती आल्या. त्यामध्ये तुम्हीसुद्धा माझ्याशी प्रेमाने बोलता. माझे मामा, माझे मिस्टर आणि आता तुम्ही. मावशी माझी कथा सांगितली तर तुम्हीसुद्धा आश्चर्यचकित व्हाल.

मावशी, मी कमनशिबी; परंतु नशीबवान मुलगी आहे. माझा जन्म झाला आणि माझी आई हे जग सोडून गेली. त्यामुळे माझे पिताश्री सतत रागवत असत. मला मारसुद्धा द्यायचे. मला कारण समजत नव्हते. परंतु मला सांभाळण्यास एक बाई ठेवली होती. हळुहळू ती बाई माझ्या वडिलांच्या बरोबर झोपायलासुद्धा लागली. मी जसजशी मोठी होत गेले तेव्हा मला समजले की वडिलांनी तिच्याशी लग्न केले. मला सांगण्याचे निमित्त. परंतु त्यांना लागलेल्या वासनेची भूक भागविण्यास तिचा उपयोग झाला आणि ती गरोदर राहिल्यावर वडिलांना लग्न करणे भाग पडले. कारण आम्ही चाळीत राहात होतो. आता मला समजले की माझा राग व मला त्रास देणारी बाई माझी सावत्र आई आहे. मला एक सावत्र भाऊ झाला. मला बरे वाटले की कोणीतरी आधार देणारी व्यक्ती जन्माला आली. परंतु व्यर्थ. मी स्वयंपाकघरात जागा पुसून रात्री १० वा. नंतर एक कंदिल घेऊन अभ्यास करू लागले. माझी सावत्र आई सुशिक्षित नव्हती. तिला माझा खूप राग यायचा. परंतु देवाच्या कृपेने मी शाळेत हुशार विद्यार्थिनी म्हणून चमकू लागले. माझे वडील तर मला शाळेत घालावयास तयार नव्हते. परंतु माझे मामा माझ्या फीचे पैसे भरत होते. मला शाळेतून नंतर स्कॉलरशिप मिळाल्यावर माझे वडील काही बोलू शकत नव्हते. मला जेवण्यास धड मिळत नव्हते. माझ्याशी घरात कुणीही बोलत नव्हते. या सर्व गोष्टींना तोंड देऊन मी ठरवले की मी कधीतरी चांगल्या स्थितीत राहीन. आशा आणि ध्येयवाद हे दोन्ही मी माझ्यावर ठसवून दिले आणि कुणीही रागावलं तरी मी उलट उत्तर देत नव्हते. गत जन्मीचे भोग भोगून मी नक्कीच चांगल्या ठिकाणी एक दिवस राहावयास जाईन हे माझे स्वप्न होते. आणि ते माझ्या पतीने पूर्ण केले.

मी एसएससी परीक्षेत चांगले मार्क्स मिळवून पास झाले. वडिलांच्या जवळ मला कॉलेजमध्ये घालावयास पैसे नव्हते. परंतु माझे मामा कॉमर्स कॉलेजात प्राध्यापक होते. त्यांनी मला फ्रीशिप देऊन

## आत्मभान

फिस्कटलेल्या वाटेवरती
माझे मला, मीच सांवरले
विस्कटलेल्या नात्यावरती
शालीनतेचे पांघरुण घातले
खरे तर -
तसे काही नव्हतेच नाते
डोळे फक्त डोळ्यास भिडते
प्रेमाचे बीज रुजायचे होते
रुजण्याआधीच उडाले होते

भर दुपारी मित्रा संगे
आला होतास घेऊन गाडी
'फिरायला चल जाऊ' म्हणालास
जणु चाखायची पेपरमिंट गोळी?

'हो' म्हणते तर कदाचित
कुणास ठाऊक काय होते?
चित्रपटगृहात अंधारात
हात बीत धरले असतेस!

मात्र पदर वेढुन घेत
'नाहीच' म्हणुन मी टाकले
भर दुपारी माझ्या कानी
संस्कारांचे सेफ्टीव्हॉल्व्हज होते.

हल्लीच्या मुलींसारखी तेव्हा
पर्समध्ये 'कंडोम' बाळगण्याची
गरजच कधी वाटली नाही
सारे आपसुकच सेफ होते

'नाही' म्हणायची धमक होती
ॲसिड विसिडची भीति नव्हती
लोभस, लाल माती वाटेवरती
आत्मभानाचे अभ्रक चमकत होते.

**-कल्पना सुभाष कोठारे**

कॉलेजात प्रवेश दिला. त्यामुळे मी जास्तच भारावून गेले. झाड सुकत असताना पाण्याचा ओलावा मिळतो तसे मला वाटले. आपलं जीवन आता झाडासारखे फुलवणे आपल्याच हातात आहे. माझं जीवन आता नक्कीच चांगले होईल या विचाराने मी आनंदून गेले. दरवर्षी मी जोमाने अभ्यास करून पास होत गेले आणि बीकॉमच्या परीक्षेत कॉलेजात पहिली आले. मामांनी माझी पाठ थोपटली आणि म्हणाले ''पुढे शीक. नक्कीच तू सी.ए. होशील.'' घरात माझे कुणीही कौतुक करीत नव्हते कारण माझा भाऊ एकेक इयत्तेत दोन दोन वर्षे काढीत होता. माझी आई माझा वेळ कसा वाया जाईल हे पाहात होती. बरीचशी कामे माझ्याकडे देण्यात तिला आनंद वाटायचा. मीसुद्धा ठरवले शक्य तितके तास कॉलेजच्या ग्रंथालयात व सी.ए. इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयात वाचत बसायचे. कॉलेजमध्ये असतानाच मी सी.ए. एन्टरन्सची परीक्षा दिल्यामुळे मला काहीच प्रॉब्लेम नव्हता. माझ्या मामांनी मी सी.ए. करण्यासाठी खूप हट्टच केला. आणि एका सी.ए.च्या कंपनीत मला आर्टिकलशिप मिळवून दिली. हळूहळू मीसुद्धा आवडीने काम करू लागले. माझे काम माझ्या कंपनीच्या मालकाला आवडू लागले. त्यांना जेव्हा माझ्या घरच्या गोष्टी समजल्या तेव्हातर ते माझ्याकडे जास्तच लक्ष देऊ लागले. त्यांनी मला पार्ट टाईम शिकवण्या दिल्या. मला थोडेबहुत पैसे मिळू लागले. काही माणसे चांगुलपणा घेऊन जन्माला येतात. तर काहींना दुष्टपणे वागण्याचा छंद असतो. माझ्या वडिलांनी माझे कधीही कौतुक केले नाही. परंतु प्रेमाचा ओलावा मला माझ्या मामा मामींकडून आणि आज तुमच्याकडून मिळतो आहे. मी माझे कर्तव्य म्हणून घरखर्चाला पैसे देत होते. मला कसेही जेवण मिळो; मला आता पर्वा वाटत नव्हती.

सुखाची खरी किंमत दु:ख भोगल्याशिवाय कळत नाही. एक दिवस मला एका मोठ्या कंपनीत ऑडिटसाठी पाठवलं आणि मला सुहास भेटला. तो माझ्या बरोबरच काम करीत होता. माझी आणि सुहासची दोस्ती आणि नंतर प्रेम कसे घडले हे माझं मलाच समजलं नाही. एक आधार तुटलेल्या वेलीला 'सुहास'सारख्या भक्कम झाडाचा आधार मिळाला. आणि माझं जीवन आनंदाने फुलून गेले.

मी हुशार असून माझ्या सावत्र भावाला शिकवत नाही याची खंत माझ्या सावत्र आईला व वडिलांना वाटत होती. आपला जन्मदाता कधीतरी सुधारेल

असे मला वाटत होते. मावशी, माझ्या आईचा फोटो सतत माझ्या पर्समध्ये मी ठेवत होते. तो वडिलांच्या नजरेस पडल्यावर त्यांनी माझ्यासमोर फाडून टाकला.

'सुहास' हा माझ्याच बॉसच्या बहिणीचा मुलगा. त्यामुळे माझी कर्मकहाणी त्याला माहीत होती. मला कुठल्याही मुलाबद्दल कधी आकर्षण वाटत नव्हते. परंतु सुहासकडे मी कशी खेचली गेली हे समजलेच नाही. दिवस जात होते आणि एक दिवस माझा फायनल सी.ए.चा रिझल्ट लागला. आणि मी त्या परीक्षेत पहिली आले. परमेश्वरा, तुझे कसे आभार मानू मी?

माझ्या मामामामींना पेढे घेऊन नमस्कार करण्यास प्रथम त्यांच्या घरी गेले. आणि मामींनी मला अक्षरश: मिठी मारली. त्यांचे डोळे अश्रूंनी भिजले. कारण बऱ्याचदा माझी परीक्षेची फी किंवा इतर काही खर्च माझा मामा पुरवीत होता. त्यांना स्वत:ला मूल नव्हते. आज मी इतकी मोठी झाले ते माझ्या मामामुळे आणि वडिलांमुळे! कारण आई वडिलांनी माझा छळ केला नसता तर मला कदाचित इतकं शिक्षण घेण्याची इच्छा झाली नसती. (Blessings in disguise)

काही  दिवसांनी मला सुहासने लग्नाची मागणी घातली. आणि मी होकार देऊन अक्षरश: सुटकेचा निश्वास टाकला. रजिस्टर लग्न करून आम्ही आमच्या लग्नाची पार्टी एका मोठ्या हॉटेलमध्ये दिली. आई वडिलांनासुद्धा आमंत्रण दिले होते. परंतु ते आले नाहीत. माझ्या मामामामींच्या उपकाराचे कर्ज मी कसे फेडू याचा मला प्रश्न उरलाच नाही. आज नाही उद्या मला हे कर्ज फेडावेच लागेल.

सुहाससारखा शिकलेला घरंदाज जावई मिळाला म्हणून ते खूष झाले. मी व सुहास समोरच्याच बिल्डिंगमध्ये दुसऱ्या मजल्यावर राहतो. त्याच्या त्या मोठ्या घरात राहताना मला चाळीच्या दोन खोल्या आठवतात. परमेश्वराकडे 'देर' असतो पण 'अंधेर' नसतो.

मावशी, मी कमनशिबी परंतु नशीबवान मुलगी आहे. मावशी, जन्मानंतर माझी माता मला सोडून गेली 'पिताश्री' सतत रागवत राहिले. सावत्र आई त्रास देत गेली. परंतु नवरा मात्र मला चांगला मिळाला. मावशी, तुमचे चरण आमच्या घराला लावा व आशीर्वाद द्या. मला आता घरी जायला हवं. सुहास घरी आला असेल.''

मला मात्र या मुलीचे खुप कौतुक वाटले. परिस्थितीवर मात करण्याची शक्ती हिला तिच्या मृत मातेचा आत्मा देत राहिला अगर दिली असावी. जे मिळते त्यात सुखी राहून आपले दु:ख उगाळत न बसता 'सुखाचा शोध' घेतला.

## नियती

नाही हाती जगणे मरणे
मानव नियतीचे खेळणे ।।धृ.।।
कठपुतळ्यांचा खेळ मनोहर
सूत्रधार तो कुशल खरोखर
हाती अमुच्या फक्त भराभर
तालावर नाचणे ।।१।।
हुकूम सुटतां हुकुमशहाचा
अविष्कार हा नऊ रसांचा
प्रत्येकाचा ठरीव साचा
तशी भूमिका करणे।।२।।
विविध भूमिका प्रसंग यांचे
तयार मिश्रण तयार साचे
तरीही त्यांतुनी व्यक्तित्वाचे
अबाधित्व राखणे।।३।।
असे सर्व ही त्याची लीला
मानव त्याचा असे बाहुला
प्रवेश-गमन ही अखंड माला
चालू हे गुंफणे।।४।।
जीवनाचा अर्थ कळेना
'मी' पण तरीही कधी सरेना
मानवाचे मुळी संपेना
अहंकारी वागणे।।५।।

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# बदल


## ✶ सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर ✶


❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

बदल हे आयुष्याचं अपरिहार्य परिमाण. त्यानुसार होणारे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यावरचे परिणामसुद्धा अपरिहार्यच. प्रत्येकाच्या आयुष्याच्या रंगरूप आकारानुसार हे वेगवेगळे असणं अपेक्षितच आहे. खरं तर दोन पिढ्यांमधलं अंतर हे पूर्वीपासूनच त्या बदलाचे मैलाचे दगड. तसं ते प्रत्येक जुन्या पिढीला खूप जाणवणारं, अस्वस्थ करणारं. प्रत्येक नवीन पिढी नव्या गोष्टीचं जोरदार समर्थन करणारी. स्वीकारणारी. हे असं गेली कित्येक वर्षे अव्याहतपणे चालू आहे. ह्या समर्थनात निसर्गसुद्धा नेहमी बदलतच असतो कीं हा मुद्दा घोटला जातो. तसंच काळ पुढे चाललाच. काळाचं भान ठेवायलं‘च’ हवं यातला ‘च’ जरा जास्तच जोरदार.

हे सगळं सगळं खरं असलं तरी आता होणारे बदल हे फार वेगानं होतायत असं नाही वाटत? ह्या वेगाचा हात पकडून धावताना प्रत्येकाचीच खूप दमछाक होतेय. अगदी नव्या पिढीचीसुद्धा. मग त्यामुळे दोन पिढ्यामधलं अंतर वेगानं वाढतंय. आत्ताच पुढच्या पिढीपर्यंत हात पोहोचायला खूप आटापिटा करावा लागतोय. मागच्या पिढीला भिती वाटतेय की कदाचित लवकरच कदाचित कशाला, नक्कीच लवकरच पुढची पिढी सपासप पुढचं अंतर एवढ्या झपाट्यानं चालून जाईल की तिचं आकलन तर सोडाच पण दर्शनसुद्धा दुर्लभ, दुर्मीळ आणि बघूनही काहीच न कळणारं होईल.

मुलांच्या शिक्षणापासून ते दप्तरापर्यंत सर्व काही बदललंय. मुलांच्या दप्तरांची ओझी तशी पूर्वीपासूनची. पण आता हे वजन प्रमाणाबाहेर बदललं. घरी आल्याआल्या पूर्वी मुलं हात पाय धुवून, खाऊ खाऊन गृहपाठ करायची. आता पहिल्यांदा आईचा मोबाईल घेऊन खेळायला सुरुवात करतात. शाळेतून आणायला किंवा स्कूलबसमधून उतरवून घ्यायला आलेल्या आईबाबा किंवा आजी, आजोबा यांचे मोबाईल रस्त्यातच काबीज करतात आणि खेळायला सुरूवात करतात. ते नसेल तर सोसायटीच्या आवारात ठेवलेल्या स्वत:च्या सायकलींवर दप्तरासकट किंवा दप्तर उतरवून ठेवून आरूढ होऊन कंपाऊंडभर आणि बिल्डिंगभोवती फेऱ्या मारायला सुरूवात करतात. घरात गेल्यावरही खाण्याकडे लक्षच नाही. लगेच थोड्याच वेळात कपडे बदलून खाली खेळायला जातात. खूप उशीरा घरातून बराच आरडाओरड करीत मारलेल्या हाकांनंतर घरी जाऊन टी.व्ही. बघत बसणार. रात्रीचं जेवण असतंच. नंतर झोपेची वेळ. ह्या सगळ्यातून कसातरी वेळ काढून होमवर्क. अभ्यासाच्या नावानं शून्यच. म्हणून ट्यूशन्स त्या तर हल्ली के.जी.पासूनच अनिवार्य.

जुन्या सुंदर सुमधूर गाण्यांची जागा नवीन गाण्यांनी घेतली. नवं स्वागतार्हच असतं. पण नव्याच्या नावाखाली नुसताच वाद्यांचा कर्णकर्कशश धांगडधिंगा, त्यात हरवलेले कधीकधी (नव्हे बहुतेक वेळा) अर्थहीन, अभिरुचिहीन शब्द, सिनेमातलं असेल तर जोडीला विक्षिप्त दर्जाहीन अंगविक्षेप हे सगळं आलंच. रिमिक्सनं तर जुन्या गाण्यांचीही मजा घालवली. नाविन्याच्या स्वगतामध्ये आपण त्या बदलांना सामोरे जाताना नेमकं काय घेऊन पुढे जायचं हेच कळलेलं नाहीय. डोळस, साक्षेपी दृष्टिकोन ठेवणाऱ्यांना तर कळतच नाही - चक्रावून जायला होतं. उगीचच एखाद्या गाण्याला कुणीतरी वाहवा देतंय मग आपण नाही दिली तर आपण मागासलेले दिसू की काय ह्या भितीपोटी आपणही टाळ्या वाजवायला हात उचलतो नी फक्त गाण्यांच्याच नाही तर इतरही बाबींमध्ये आपण किती जगाबरोबर आहोत ही शेखी

मिरवण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करतो.

मोठ्या मुलांची दुनियाच वेगळी. तंत्रज्ञान खूप वेगानं पुढं जातंय. नवीन नवीन तंत्रज्ञानासह नवीन नवीन मोबाईल येतायत. त्यावरच्या वेगवेगळ्या 'ॲप्स'मुळे जग खूपच, कधीकधी नको तेवढं जवळ येऊ पाहतंय, जवळ येतंय. यातल्या सगळ्याच गोष्टी खरंच गरजेच्या आहेत का? हा प्रश्न आता पडतच नाही. कारण असा प्रश्न पडणं हेच मुळात कुणालाही मान्य नाही. आता ह्या 'मूलभूत गरजा' बनत चालल्यात. हातात सतत मोबाईल (खरं तर स्मार्टफोनच) नाहीतर टॅबलेट घेऊन चालायचं. मग रस्त्यातल्या मोटारींची, समोरून येणाऱ्यांची पर्वाच करायची नाही. (समोरच्यानं स्वत:ला तर जपायचंच पण त्यानं आपली पर्वा केली नाही तर मात्र राग येतो.) दर सेकंदाला चॅट करत राहायचं. 'आत्ता मी रस्ता क्रॉस केला' किंवा घरात असलं तर 'आत्ता मी आंघोळीला जायच्या तयारीत आहे.' असले मेसेजेस एक्सचेंज करायचे हे अत्यंत 'गरजेचं'. त्याशिवाय श्वासच घेता येत नाही. ऊठसूट 'सेल्फी' काढायचे ते सोशल मीडियावर 'पोस्ट' करायचे. स्मार्ट फोन तो ही त्यातल्या त्यात अत्यंत महागडा कसा घेता येईल याचाच सदैव विचार. त्यासाठी पैसे कमवायचे.

पण इतरही 'गरजा' आहेतच की! सगळ्यात 'लेटेस्ट' तंत्रज्ञान असलेलीच गॅजेट्स (वस्तू नव्हे हं) हवीतच. मग धावा की रॅटरेसमध्ये ! नोकरीत हमरीतुमरी, जीवघेणी स्पर्धा, छुपी कारस्थानं, नाहीतर मग वाट्टेल त्या मार्गानं पैसे कमावणं, त्यासाठी प्रसंगी घरातल्यांचे खून करणं इथपर्यंत नवीन पिढी पोहोचली आहे. सध्यातरी अशी उदाहरणं थोडीशीच आहेत. पण हे सर्रास व्हावयाला वेळ नाही लागणार. ज्यांना ते जमत नाही ते आत्महत्येचा अत्यंत अपरिहार्य मार्ग अवलंबतात. नैराश्याच्या गर्तेत एखाद दुसराच जीव असायचा. आता मात्र तिथं गर्दीच गर्दी होऊ लागलीय.

सर्वच पालकांना मुलं चांगल्या मोठ्या शाळेत जावीत असं वाटणं स्वाभाविक आहे. पण आता पीक निघालंय ते इंटरनॅशनल स्कूलचं. परवडत नसणारी फी, दुसरे अवांतर अवाढव्य अपरिहार्य खर्च, युनिफॉर्म्स नी आजूबाजूच्या जास्त श्रीमंत मित्रमैत्रिणींसारखं किंवा त्यांच्यापेक्षा जास्त एक्सपेन्सिव्ह काहीतरी हवं असणं हे मुलांचे हट्ट. या सगळ्यापायी घराची आर्थिक स्थिती खालावत जाणं वाढलंय. त्यापायी आणखी कमाई. खर्चात भर

## हास्यचित्र



घालणारे व्यक्तिमत्व विकासाचे क्लासेस नी तिथं ये जा करण्यासाठी पालकांची धडपड. त्यातून मग आईनं नोकरी सोडणं किंवा मुलांसाठी वेगळी मोटार नी ड्रायव्हर ठेवणं, मुलांना ह्या क्लासबरोबरच अभ्यासाचे, डान्सचे, ड्रॉईंगचे, पेंटिग्जचे जेवढे जेवढे म्हणून क्लासेस सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि सुट्टीच्या दिवसांचे लावता येतील तेवढे लावणं नी तिथं न्यायला आणायला भले मोटारीतून असो. आजी आजोबांची नेमणूक... विचार केला तरी दमछाक होते, तिथं ह्या सगळ्याला पुरेल नी पुरून उरेल एवढा पैसा कमावणाऱ्यांची दमछाक होणारच.

शिवाय जेवढं 'स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग' (आपलं राहणीमान हो) उंचावेल तेवढं मग जास्तच उच्चभ्रूमध्ये वावरणं. क्लब्ज जॉइन करणं, त्यांच्या महागड्या वर्गण्या भरणं नी आज ह्या पार्टीला जा, उद्या त्या पार्टीला जा हे तर करायलाच हवं ना? आणि मग आपल्या 'स्टेटस्'ला साजेशा पार्ट्या त्याही वारंवार 'थ्रो' करणं आलंच. नातेवाईकांच्या आपापासातही अतिशय फुटकळ निमित्तांनी पार्ट्या दिल्या जातात नी ज्यातल्या काहींना परवडत नसतानाही द्याव्या लागतात. उदा. मुलांचे, नातवंडांचे दहा वर्षांचे वाढदिवस, पंचवीस, तीस, मग पन्नाशी गाठू की नाही या भितीपोटी चाळीस वर्षांचा वाढदिवस, नंतर पन्नाशी गाठली म्हणून पन्नास वर्षांचा वाढदिवस, त्यानंतर साठी, सत्तरी, पंचाहत्तरी - प्रत्येक ५ वर्षांचा मैलाचा दगड गाठायचाच. तीच गोष्ट लग्नाच्या वाढदिवसाची. ह्यात पुष्कळदा एक गोम असते. हल्ली प्रत्येकालाच वरची पोस्ट मिळते. मग एन्टरटेनमेंट अलाऊंस आलाच. प्रत्येकाला कंपनीच्या कस्टमर्ससाठी हा खर्च करण्याचा योग येतोच असं नाही किंवा आला तरी अलाऊंस खूपच मिळतो. तो मग अशा पार्ट्या दिल्या की ते बिल दाखवून कंपनीकडूनच वसूल करता येतो. थोडक्यात बेईमानी. अर्थात सगळेच असे नसतात. कधी कधी पदरमोड करून आपणही अशा पार्ट्या देऊ शकतो हे दाखविण्यासाठी पार्ट्या दिल्या जातात. तेव्हा पुन्हा गिफ्टस् व रिटर्न गिफ्टस्ची देवाणघेवाण असतेच.

समाजाचा स्तर उंचावला गेला तर चांगलंच असतं. पण तो सांस्कृतिक, सामाजिक दृष्ट्या चांगल्या बाबतीमधला असायला हवा. तंत्रज्ञान जेवढं प्रगत तेवढं गुन्ह्यांचं प्रमाणही आणि रूपही वाढतंय - समाजाच्या दृष्टीनं विधायक तेवढंच विघातकही. मानवी मूल्य जपू पाहणारे आता मोडीत निघतायत. त्यामुळेच बदलांमधील चांगल्या मुद्यांना व चांगल्या प्रकारांना एक प्रकारचं गौणस्थान मिळत चाललंय हे कुठेतरी थांबायला हवं. शिक्षणाच्या नवनवीन शाखांच्या नवीन प्रगतीला, नवीन शोधांना चांगल्या वैचारीक मूल्यांची बैठक मिळायला हवीय. चांगल्या वर्तणुकीच्या खऱ्या सोन्याची चौकट किंवा कोंदणं मिळायला हवीत. तरच चांगली संस्कृती टिकून राहील. चांगली संस्कृती म्हणजे 'धर्म'की चांगला 'धर्म' म्हणजेच 'कर्तव्य' हेच न समजल्यानं हा आणखी एक बिकट, गुंतागुंतीचा प्रश्न होऊन बसलाय. या सर्व काळोखातून चांगल्या विचारांनी समाजपरिवर्तनाच्या दशदिशा केव्हा लखख प्रकाशानं उजळतील ह्याचीच आता वाट बघायचीय.

*

**(दुबईतील 'वॉटरपार्क'चा अनुभव)**

## अरत्र ना परत्र

निळ्या निवांत आकाशाखाली
मी शांत-क्लांत पहुडलेली,
समोर अथांग समुद्र -
मी? - अरत्र; ना परत्र!

उत्साहाचा संबळ साज
मागे माझ्या गोंधळ गाज,
विलक्षण वेगाने पळते यंत्र -
मी? - अरत्र; ना परत्र!

सुसाट पाण्याची संतत धार
वेगवान टायर करतो पार
चिंब त्यात 'हा', 'तो', 'ती', 'ही' - मित्र -
मी? - अरत्र; ना परत्र!

खाणे, पिणे, नाचणे, गाणे
शरीरस्पर्शांचे बेभान उखाणे
जगण्याचाच की हा मंत्र
तरीही मी? - अरत्र ना परत्र!

**-सुहासिनी कीर्तिकर**

लेख

# Social Networking- Bane or Boom

✶ Aatish Aloke Pradhan ✶

Facebook! That's the first thing that sprung to my mind when I read 'Social Networking' – partially because of the David Fincher film 'The Social Network'. It is all about Mark Zucherberg's life, but let's face it what an amazing idea! With more than two billion people using it, it's no surprise that almost all of us have an account on it. For some, it's their way of connecting and sharing with friends or loved ones. For others, it's simply another way to get a life on 'Candy Crush'.

I remember my first experience on Facebook. I had installed it after my tenth grade Board examinations. Since my friends were already on it, they recommended that I should install it and there it began. I signed up with the required details and then immediately called my friend, "Hello, Yash! Check Facebook… I've installed it and sent you a friend request!". Since WhatsApp didn't exist back then, we would still call one another. Once my friend was online, it was only 20 questions and a rather annoyed best friend later that I had fully understood how it worked. Over the next couple of days I got to use Facebook a lot more frequently but I had to stick to Aai's "Only one hour a day of laptop or TV!" It was fun, occasionally sharing hilarious pictures of one another, on each other's profile or discussing the fun things we did in college .

Then came WhatsApp, the first cross-platform instant messenger on my phone and I still thank God for it.

I am an engineering student now, and it is our lifeline. It makes sharing notes, assignments and projects so much easier and so much quicker. I remember my seniors telling me stories of how they would have to stay over at each other's place and complete those assignments and journals that they would have to submit the next day.

There are still those professors who believe that giving - us Third Year students 50 page assignments – usually to be submitted the next day, is going to "help us understand the topic" ! That's when WhatsApp comes into the picture. We split the task, each person writes 5 pages and then uploads it onto the group, then we're free to sit at home, write it out and submit it the very next day. People tend to use WhatsApp over SMSs and MMSs because it is cheaper. Over hundreds of texts, images and videos can be shared instantly at an almost negligible cost.

WhatsApp and Facebook are two social networking sites that I use and think it's perfectly fine and safe to use, as long as you limit the kind of content you upload on Facebook. People treat Facebook like their personal diary at times, accounting every single moment of their life, like checking into a restaurant, (visiting the restroom !) or going to some place for a vacation, this is all done instantly and in real time. I strongly believe in privacy and

wouldn't want all of my Facebook friends knowing what I'm doing every second of my life. I often get friend requests from people that I haven't met and I don't accept their requests. You never know what they have in mind or that they could be fake profiles. Yes, that too! Cyber criminals often use this to hack into other people's profiles and upload content that can at times be disturbing and there is no way of identifying who has really uploaded it.

Social networking although being a huge boon to humanity can be misused and one must be wary of cyber criminal activity.


It still amazes me how social networking has changed the world, while some are getting addicted to it, which is causing them various health related issues like eye problems and depression – often because of less likes for a photo, others are making their fortune off it by advertising correctly on them. Most consumer caring companies now have feedback forums and online help pages which run using Facebook where the staff reply to queries and resolve issues related to their products.

With so many social networking sites and applications coming up every day it's going to be immensely exciting to see what the future of Social Networking holds in store for us- Virtual Reality maybe. You and I are just a click away. It's no longer 'word of mouth' that gives you recognition, it's 'click of the mouse' that will do so !

---

## हास्यचित्र



# Approaching Sixty
## Gratitutute Towards Parent

-Milind Kothare

I always keep thinking how our parents were matured & serious at this age where as we are still very bubbly & casual in our life but when I chose to think & find cause of this change I realize that it is their struggle which made our life smooth & successful hence we are in a position to be fresh & bubbly even at sixty.

On True Wealth Creation

We are groomed & nurtured our personality in a environment which believed in values in.

Conducting ourselves in day to day life,

Always restricting to fair means of earning money,

Wealth creation was far cry because we were struggling to meet both ends.

With these values you struggle & climb the career path & make then struggle to achieve small monetary objectives like house, car, pension fund etc & think that is your wealth creation.

Then there is a eye opener recently when I was struck with a terminally ill decease all my close friends got togather & deployed all their resourses behind me because at that hour it was not monitory need but a strong moral support of spending their invaluable time from their busy schedule to be with me & consol me.

I thought this factor of earning such a lot of friends support was a true wealth that I created out of my life long fair conduct.

On Understanding Of Economic Environment.

Earlier with the warning of economist one would get worried about the inflation, ,recession life & business getting difficult but with the age now you realize to get deep in to subject & make your own judgment about economy ,cycles & way forward to resolve it.

On Generation Ego.

Well most of us always thought that our generation will cater to both the generations like our parents as well as our children & their well being even upbringing of grand children etc but feel that they should not expect anything in return.

Well this is again a myth if you have given to them with both hands they are bound to return.

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# An Unforgettable Visual Fiesta– Shatabdi Express!!

**✶ Deepashry Sudeep Kothare ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Clap! Clap! Clap! Hip! Hip! Hurray!

A 'par excellence' team performance by our P.P. damsels where age saw no bar … yes…. It was a visual fiesta to see an 'Aaji & Nat' performing very gracefully on the same platform… What a progressive change! Readers… your guess is right... I am talking about none other than the much appreciated Shatabdi Express... it is already a year now but some events in our life are so adorable that you feel happy revisiting them …

This mega event had encased it all-- drama, verse, dance, speeches et al... Certainly, the crowning glory was the Fashion Show which portrayed very beautifully in four stages the Evolution of a Woman in the last 100 years….indeed a novel idea… very well – depicted which got us crawling back into History books.

Tickets had got sold weeks in advance... so I learnt .Thus, the early birds were fortunate to experience the multi-splendoured fun. Needless to say, many hands and minds labored through night and day … months in advance, only to make the show

an extraordinary one being Centenary celebration time. All the feminine participants sacrificed their family time and spare time (both being so precious with the passing times) to be available for practices or any area of service they were offering. Practices were held at different venues. It was FUN in caps!!

All the sentiments expressed in joyous applause but I feel disheartened and saddened to say in the same frame of verbal expression that two names were completely omitted to sure extinction from the list of participants …these two P.P. enthusiasts worked end to end , in spite of their busy working cum home lives, tirelessly …. One with graceful choreographing which is her forte and the other adorned the ladies with colorful attires and a variety of jewellery ….Both had to co- ordinate with the umpteen participants … yes...they juggled between their families and preparations for this super special performance unfolding at Ravindra Natya Mandir . I have personally seen them toiling hard with first – timers so as to churn out excellent entertainment in honour of our P.P. audience.

As the old adage goes …Give the devil his due … these two devils are our sweet angels by the names of Mayura Nayak and Janhavi Kirtikar who had a giant share in the multifold success of that evening. I fail to understand HOW these two names were totally omitted in the Mahila Samaj Annual Report 2015 - they worked back stage and front stage - the accolades go incomplete without their mention.

Both are very dependable, knowledgeable, dedicated and of course very confident in their arena of expertise.

Bravo, Mayura and Janhavi!

Keep the show going! Girls, you are our P.P. pride! Bless you!

✳

# जरा हटके

## ✶ सौ. कल्पना सुभाष कोठारे ✶

एक पाठारे प्रभु तरुण, व्यवसायाने संपादक आहे. वक्तृत्व आणि लेखनाबरोबर छायाचित्रणही त्याने आत्मसात केलेले आहे. हा 'ऑटो, फोटो जर्नालिस्ट' उत्तम वाहन चालकही आहे. त्याचे नाव आहे, रौनक निखिल चित्रसेन अजिंक्य. हा माझ्या भावाचा नातू! रौनकचे आजोबा, सुमंत शामराव कोठारे, हे दादाजी धाकजी कंपनीत नोकरीत असताना, कंपनीने त्यांना भांडुपच्या अे.पी.आय. कंपनीत प्रशिक्षणास पाठविले होते. त्यामुळे मुंबईच्या रस्त्यावर पहिली लांब्रेटा (स्कूटर) उतरवून चालविण्याचा पहिला मान त्यांना मिळाला होता. रौनकचे वाहनप्रेम रक्तातूनच तर आले नसेल? उत्तम वक्ता व लेखक बनण्यासाठी लागणारे विद्यावैभव त्याने बहुधा त्याच्या सुविद्य, अजिंक्य आजी आजोबांकडून घेतले असावे. रौनकचे वडील निखिल व आई वर्षा, ह्यांनी तरुणपणी, ग्लायडिंग, हॅन्डग्लायडिंग, पॅराग्लायडिंग वगैरे साहसी छंदांचा पाठपुरावा केलेला आहे. 'एच.एम.आय. या संस्थेत महिलांना प्रवेश का नाही?' हा प्रश्न पंडित नेहरूंना पत्रातून विचारून, भारतातील पहिल्या महिला गिर्यारोहक टोळीत सहभागी झालेली धाडसी महिला शालिनी कोठारे ही रौनकची आत्याआजी!

रौनकही अशाच एका धाडसी छंदाचा मानकरी आहे. 'मोटरिंग' नावाच्या मासिकाचा तो सहसंपादक आहे. हे मासिक दरमहा नित्यनूतन, विविध चारचाकी व दुचाकी वाहनांची जाहिरात करते. परंतु या जाहिराती म्हणजे केवळ छायाचित्रे नसतात. गाड्यांच्या तांत्रिक माहितीबरोबरच इथे उत्तम प्रवास वर्णनेही वाचायला मिळतात. कारण नवीन गाड्यांच्या मालक कंपन्या या संपादक मंडळींना, स्वखर्चाने प्रवासास पाठवितात. फक्त दोन धाडसी तरुण, नवीन गाडी चालवीत हिमाचल प्रदेश, केरळ वगैरे दूरच्या



अवघड वाटा चोखाळतात. आपण चालविलेल्या गाडीची अंतर्बाह्य माहिती देता देता, ते उत्तम प्रवासवर्णनांचे लेखकही बनून जातात. प्रवास वर्णनात कॅमेरा जवळ बाळगल्याने उत्तम छायाचित्रणाचीही त्यांना सवय असतेच. अशा या 'जरा हटके' क्षेत्रातील एक मेहनती, धाडसी तरीही नम्र अशा प्रभुतरुणाची ही मुलाखतद्वारे घडवून आणलेली भेट दीपावलीनिमित्त तुमच्यासाठी : -

Dear Rajani Aji!

I'd like to start off by saying that I'm extremely honoured that you've sonsidered me as an inverviewee on behalf of Prabhu Tarun. I'll try and answer all questions put forth to the best of my abilities.

**'How Come you were not as crazy as other kids to become a doctor or an engineer?'**

I'm not sure about 'crazy', but I never fill in line with those who strived for academic excellence. And while helping and healing others, and creating and inventing utilities to make man's existence easier and more comfortable are noble eneavours, no doubt, my interests, as I found out, lay elsewhere. While we've all been communicating with each other in one form or another since the beginning of time, managing to precisely express onself to an audience is an art

that few have mastered, and it's one that intrigued me. Indeed. I will, hopefully, master that very art some day. Here's to hoping!

**'What are your gaulifications? Did you undergo any special training for your present job?**

It's a funny world we live in, isn't it? What I was focusing on for the most part during college had nothing to do with journalism. I graduated from Symbiosis with a degree in Commerce. And it would have been my only real graduation qualification were it not for the Liberal Arts course I enrolled in in my sophomore year. The Liberal Arts course, which I took up purely because I wanted to bolster my CV with something more than just a B.Com degree, was a shot in the dark initially. Over two years, however, it taught me how to be more decisive in my writing, how to spin a yarn out of nothing, and simply how to make audiences sit up and listen to you a whole lot better. Needless to say, finding perfection in writing is an endless pursuit, but it's ajourney that keeps you hooked. Well, keeps me hooked, at least.

**'Can you explain about your career?'**

I've decided to try my hand at automotie journalism. As the name suggests, It' about getting to know vehicles, be it cars or motorcycles, or anything in between, and putting it across to an audience via various mediums like magazines, the internet, videos, and the like. Obviously, the manner in which you express yourself counts for a lot, as does the amount of insight in your articles, and that's a touch ask in this day and age. It's because our attention spans are dwindling in this era of quickly news, quicky updates, and quicky interactions. That's why It's become important to hook your reader in as quickly as possible. Leaves little room for ramblin, which every writer loves doing, but it is the way it is, I suppose.

**'Do you maintain a diary while travelling? Or do you write your travelogues after returning from the trips?'**

It works differently for different people, but I'm more the sort to jot down my thoughts after a trip.

## हास्यचित्र



**‘Which places have you been to so far?’**

I’ve been blessed with a lot of travel so far, and there’s a lot more to come. My highlights, though, would have to be the trips to Gangtok and Srinagar by road. They’re long distances that require serious planning and effort.

**‘Which model of the car you liked best?’**

I believe a question like this should be relegated to the smae societal diktat that makes it inexcusable to ask a woman her weight or how much she earns. I’ll take a stab at it anyway. In terms of the amount of happiness and joy I’ve had in a car, I suppose very little comes close to the jaguar F-Type roadster I had the privilege of driving.

**‘We are under the impression that only jeeps are good for such trips. How do your manager with the new cars?’**

An understandable notion. Jeeps, or SUVs, are build for rugged terrain and constant abuse. That said, globalization today had demanded a whole different beast when it comes to vehicles. We all want cars that can do everyting, even make your morning cuppa in some cases. It’s no wonder, then, that cars today, even the non SUV-like, soft-ish cars are capable of a lot of hardship. It’s all about keeping up with the demands of the time.

**‘What about repairs?’**

Similar approach. Cars are build stronger, hence they break down a lot less. They’re not bullet proof, though, so it hepls to have a working knowledge of a car in case something does go wrong and you’tr stranded with no help.

**‘Does your photographer colleague get to drive?’**

Of course! He/She’s a rightful member of the team and just as important as anybody else in the group. As long as he/she holds a valid license and has a steady pair of hands, he/she definitely gets to drive.

**‘Are you the first Pathare Prabhu to handle this job?’**

I don’t believe so. There may be more out there, but the most famous and honoured has to be Dhawal Dhairyawan, who was a gifted photographer and an asset to the magazine he worked for. Unfortunately, he passed away after succumbing to an illness. The industry mourned his loss, and many can vouch for the fact that there hasn’t been a talent like him since.

**‘Any scary experience?’**

None, personally. And I hope it remains that way!

**‘Future plans?’**

It’s amazing how two words can really make you think, isn’t it? With some luck, I’ll be a little wiser, and a happier person, overall. Those are my future plans.

**‘These days everything is available online. Does your magazine still get read?’**

That’s touchy subject with most magazines, but yes, we still have a fairly decent reader base across the country. That said, we do have an online presence that we’re constantly pushing to expand, so we have that base covered as well. Do us a favour, and visit our website, will you? Your help and interest is most appreciated! (Website address - www.motoringworld.net)

Thank you Rownak! May God Bless you!

*

## कोडं

माणसाला घाली कोडी
ईश्वर हौसेने
ठाऊक नाही मात्र त्याला
पर्यायही देणे ।।धृ.।।
मानवनिर्मित कोडी कैशी
भराभरा सुटता
क्वचित नाही सुटले तरीही
पर्याय तरी मिळती
संसाराचे कोडे आपण
स्वत:च सोडविणे।।१।।
उत्तरावर विचार करतां
चूक कळत नाही
योग्य मार्ग कोणता कधीही
मनुजा कळतचि नाही
कोडे सुटण्या अप्राप्यही कां
दैवसाथ मिळणे?।।२।।

**सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

## पाठारे प्रभु सोशल समाज

दि. १६-१०-१५ रोजी सोशल समाजाने कनकाई देवीच्या उत्सवात आपला कार्यक्रम सादर केला. त्याविषयीचा सविस्तर वृत्तान्त पुढील अंकी. सोशल समाजाच्या या उपक्रमाबद्दल अभिनंदन. या समाजाचा दिवाळी महोत्सव २९-११-१५ रोजी खारच्या सांस्कृतिक सभागृहात श्री. किरण रामचंद्र तळपदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तो वृतांतही पुढील अंकी.

*

## पाठारे प्रभू महिला समाज

३१ ऑक्टो. २०१५ रोजी महिला समाजाचा 'ऋणानुबंध' कार्यक्रम आणि 'शब्दांच्या गावा जावे' हा कार्यक्रम झाला. त्याविषयीचा सविस्तर वृत्तान्त पुढील अंकी.

*

## हौशी कला मंदिर

दि. १०-११-१५ रोजी दिवाळीनिमित्त 'सर्किट हाऊस'चा 'रंगशारदा' येथे प्रयोग झाला. त्याचा वृत्तान्त पुढील अंकी.

*

## प्रभुतरुणास देणगी

✶ अनामिक दात्यांकडून रु. १०००/-

✶ सौ. मानसी संजय धुरंधर (मीरा रोड) या बी.एड झाल्याप्रीत्यर्थ कु. रजनी ए. अजिंक्य (ठाकुरद्वार) यांजकडून रु. १५०/-

*

## जरा हसा

पूर्वी 'विल्स' नावाचा सिगरेटचा ब्रॅण्ड होता. आठवतंय्? तर त्या काळातील दोन मित्र संभूराव आणि बंबूराव गप्पा मारत होते. बंबूराव म्हणाला, 'मी सच्चा सेल्समन आहे. टकल्यालाही फणी विकून दाखवेन.'' संभूराव म्हणाला, ''अस्सं! मग त्या समोरच्या सरदारजीला ही 'विल्स' विकून दाखव.'' बंबूराव गेला सरदारजीकडे. म्हणाला, ''प्राजी, हे 'विल्स' म्हणजे काय; माहीतेय तुम्हाला? 'विल्स'म्हणजे 'वूमन इन लंडन लव्हज सरदारजी' सरदारजीने लगेच सिगरेट विकत घेतली! आता संभूराव म्हणाला, 'तू खरा सेल्समन असशील तर; ती सिगरेट परत घेऊन दाखव.'' हात्तिच्या! बंबूराव परत गेला सरदारजीकडे. म्हणाला, ''प्राजी, 'विल्स' उलटं वाचा. काय आहे? ते आहे 'सरदारजी लुक्स लाईक इंडियन वूमन' अर्थातच सरदारजीने सिगरेट परत केली!

*

## पाठारे प्रभू चॅरिटीज

दि. १-११-१५ रोजी 'पाठारे प्रभू चॅरिटीज' तर्फे दरवर्षीप्रमाणे ज्ञातीतील गरजू बंधुभगिनींना दिवाळीसाठी वस्तूंचे सहाय्य आणि आर्थिक सहाय्य देण्यात आले. ज्ञातीतील प्रतिष्ठितांसमवेत या सगळ्यांनी 'चॅरिटीज'तर्फे जेवणाचाही आस्वाद घेतला. त्याचा वृत्तान्त पुढील अंकी.

*

## प्रभुतरुणाची डायरी

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| ८-१०-१५ | सौ. सुवर्णा अशोक तळपदे, | वय ७०, | खार |
| १०-१०-१५ | श्रीम. अमिना अजित अजिंक्य, | वय ७०, | महालक्ष्मी |
| ९-१०-१५ | श्री. श्रीपाद नारायण धैर्यवान, | वय ८६, | खार |
| २८-१०-१५ | श्री. शाम विनायक जयकर, | वय ८५, | बोरीवली |

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**

स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८००४४